मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पितृपंधरवड्यातील काकस्पर्शासाठी करावी लागतेय प्रतीक्षा!

## जेवणावळींना लागली घरघर; काक प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर?, जुन्या चालीरितींचाही विसर



**पिंपरी | मनीषा थोरात-पिसाळ**

पितृपंधरवडा म्हटलं की या पंधरा दिवसांत पितृ जेवू घालण्याची एकच लगबग असते. पितृसाठी केलेल्या नैवेद्याला काकस्पर्श होणे या दिवसांठी महत्त्वपूर्ण मानले जाते. मात्र अनेक ठिकाणी नैवेद्य काढून घरावर बराच वेळ काव... काव... करत काकस्पर्शासाठी मोठी प्रतीक्षा करावी लागत असल्याचे चित्र सर्रासपणे सध्या पहायला मिळत आहे. त्याचबरोबर जेवणावळींनाही घरघर लागली असून काक प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. इतर पक्षांप्रमाणे कावळ्यांची संख्याही झपाट्याने कमी होत आहे. पितृपक्षात नैवेद्याला शिवण्याचा मान कावळ्याला असल्यामुळे या दिवसात कावळ्याला अनन्यसाधारण महत्त्व असते. पूर्वी पितृपंधरवड्याच्या दिवसांमध्ये खूप धांदल असायची. घरोघरी जेवणावळी असल्याने पंधरा दिवस घरी चूल पेटवायची गरज भासत नसे. भल्या पहाटेपासून घरातील स्त्रियांची स्वयंपाकाची धांदल चालायची. भोजनाच्या पंगती दिवसभर चालायच्या. परंतु, विभक्त कुटुंब पद्धतीमुळे आता पितृपक्षातील जेवणावळींना घरघर लागली आहे. पूर्वी पित्र पंधरावड्यात प्रत्येकाच्या घरी हमखास 100 लोकांना तरी आमंत्रण असायचे. सध्या मात्र, एक जोडा जेऊ घातला जात असल्याचे आढळून येत आहे. एकूणच काय; तर सध्याच्या संगणकीय युगामध्ये प्रगतीकडे झेपावताना मानवाला भारतीय संस्कृतीशी निगडित असलेल्या जुन्या चालीरीतींचा विसर पडत चालला आहे. त्यामुळे येणार्या पिढीला या गोष्टींपासून मुकावे लागणारे असून निश्चितच हे संस्कृती ऱ्हासाचे लक्षण आहे; असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

मानवाने पक्षांचा आदिवास, अन्न व जैवसाखळी डिस्टर्ब केली. झाडे तोडली, पाणवटे प्रदुषित केले. नैसर्गिक झाडे तोडून शो ची झाडे लावली. जंगलतोड , प्रदूषण, आपत्ती यामुळे पर्यावरणात बदल झाले.पर्यावरणात होत असलेल्या या बदलामुळे प्राणी आणि पक्षी यांचे नैसर्गिक वसतीस्थान नाहीसे होत आहेत.त्यामुळे त्याची राहण्याची गैरसोय झाली आहे.सतत वाढत असलेल्या नागरीकरणामुळे प्राणी व पक्षी यांच्या अन्न व निवारा या दोन्ही बाबी संकटात आल्या आहेत. त्यामुळेच काक प्रजातीसह इतर पक्षांचे प्रमाण कमी झाले आहे. पारव्यांची संख्या मात्र मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मानवासाठी पारव्यांची वाढती संख्या घातक आहे. त्याची विष्ठा आणि पंख आरोग्यासाठी हानीकारक आहेत. नैसर्गिक खाद्याऐवजी रेडिमेड खाद्य पारव्यांना मिळू लागले, त्यांना नष्ट करणाऱ्या प्रजाती नष्ट झाल्या आहेत. यासर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर जैवसाखळी तुटण्याचा धोका निर्माण झाला असल्याचे दिसून येत आहे. पर्यावरणासाठी ही चिंतेची बाब असल्याचे पर्यावरण प्रेमी प्रशांत राऊळ यांनी सांगितले.

### काक प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर?

**» सध्याच्या वातावरणीय बदलामुळे कावळ्यांच्या प्रजाती नष्ट होत आहेत. झाडांवर घरटे करून वास्तव्य करणारा हा पक्षी झाडांच्या कत्तलीमुळे रोडावत असल्याचे चित्र दिसून येत आहे. याबाबत अनेकदा पक्षी मित्र व पक्षी निरीक्षकांनीही चिंता व्यक्त केली असून काक प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे की काय? असा प्रश्नही त्यांना सतावत आहे.**



# महाविकास आघाडीच्या उमेदवारीसाठी नाना काटे अन् राहूल कलाटे यांची जोरदार फिल्डींग

## दोन दिग्गजांमुळे शहराध्यक्ष तुषार कामठे यांचा होणार पत्ता कट

**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीत चिंचवड मधून महाविकास आघाडीचा उमेदवार कोण? याची चर्चा सध्या चांगलीच रंगू लागली आहे. दरम्यान हा मतदारसंघ राष्ट्रवादी शरद पवार गटाला सुटणार की ठाकरे यांच्या शिवसेनेला याबाबत कोणताही निर्णय झाला नसला तरी, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नाना काटे आणि शिवसेना नेते राहुल कलाटे यांच्यात उमेदवारीवरून चांगलीच चुरस निर्माण झाली आहे.

या दोन्ही इच्छुकांकडून महाविकास आघाडीच्या उमेदवारीसाठी जोरदार फिल्डिंग लावली जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या दोन दिग्गजांमुळे शहराध्यक्ष तुषार कामठे यांचा पत्ता कट होण्याची चर्चा आहे. चिंचवड विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडी आणि महायुतीत उमेदवारीवरून तिढा निर्माण झाला आहे. जागावाटपावरून राजकारण रंगत असल्याचे बघायला मिळत आहे. भाजपच्या विद्यमान आमदार अश्विनी जगताप यांच्यासह भाजपमधील शहराध्यक्ष शंकर जगताप, शत्रुघ्न काटे, चंद्रकांत नखाते आदी इच्छुक उमेदवार आहेत. असे असताना आता महायुती मधून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नाना काटे हे देखील इच्छुक आहेत. ते निवडणूक लढवण्यावर ठाम आहेत. काटे हे शरद पवार गटात जाण्यासाठी फिल्डिंग लावत असल्याची चर्चा आहे.

तसेच चिंचवड विधानसभा पोटनिवडणूकित अपक्ष लढणारे शिवसेनेचे राहुल कलाटे यांनी चिंचवड विधानसभेची तयारी सुरू केली आहे. परंतु, कलाटे यांचा अद्याप पक्ष ठरलेला नाही. कलाटे यांना पक्षाच्या खंबीर साथीची अपेक्षा आहे. त्यांनी काही नेत्यांच्या भेटी घेत असल्याची माहिती देखील मिळत आहे. मतदार संघातील नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे, त्यामुळे ही निवडणूक ते लढणारच आहेत, मात्र कोणत्या चिन्हावर लढणार हे लवकरच स्पष्ट होईल असे देखील राहुल कलाटे यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले आहे.

त्यामुळे आता चिंचवडची जागा महाविकास आघाडीत कोणाला सुटणार? पवारांच्या तुतारीला की ठाकरेंच्या मशालीला हे अद्याप स्पष्ट झाले नसले तरी महाविकास आघाडीकडून उमेदवारी मिळवण्यासाठी नाना काटे आणि राहुल कलाटे यांच्याकडून तशी जोरदार फिल्डिंग लावली जात आहे. आता नेमकी जागा कोणाला सुटणार आणि उमेदवारीची माळ कोणाच्या गळ्यात पडणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# कचऱ्याच्या समस्येसाठी उद्योजकांचा 'रास्ता रोको'

## महापालिकेच्या ढिसाळ कारभाराचा निषेध करण्यात आला.




**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील उद्योजकांनी रास्ता रोको आंदोलन केले. औद्योगिक परिसरातील कचऱ्याच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. महापालिकेच्या ढिसाळ कारभाराचा निषेध करण्यात आला. फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अभय भोर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.

उद्योजक जसबिंदर सिंग, मिलिंद काळे, प्रवीण चव्हाण, कृष्णा वाळके, सचिन भगत, राहुल गरड, नितीन शिर्के, अमोल स्वामी, इसाक पठाण, उद्योजिका दुर्गा भोर, जयश्री साळुंखे आदींसह परिसरातील उद्योजक, कामगार उपस्थित होते. अभय भोर म्हणाले, "औद्योगिक परिसरामध्ये कचऱ्याची समस्या गंभीर बनली आहे. कंपनीत साठणारा कचरा रस्त्यावर टाकला तर महापालिका प्रशास न कारवाईचा बडगा उगारते. कारवाईच्या भीतीने कंपनीत कचरा ठेवला तर रोगराई पसरेल ही चिंता आहे. उद्योजकांना खासगी गाड्यांना पैसे देऊन कचरा देण्याची वेळ येत आहे. कचऱ्यामुळे अनेक कंपन्यांमध्ये कामगारांना डेंगी, मलेरिया, चिकनगुनिया यासारखे आजार उद्भवत आहेत. याचा परिणाम कामावर झाला असून अनेक कामगार सातत्याने सुट्ट्या घेत आहेत. त्यामुळे औद्योगिक परिसरात घंटागाड्या चालू कराव्यात. परिसरात स्वच्छता ठेवावी. स्वच्छतेसाठी ब्रँड अँबेसिडर नेमले असून या ब्रँड अँबेसिडरचे एमआयडीसीकडे लक्ष नाही. त्वरित या प्रश्नावर योग्य तोडगा काढावा, अन्यथा तीव्र आंदोलन करू, असा इशारा भोर यांनी दिला.

# विद्यार्थ्यांनो आवडीच्या क्षेत्रात करिअर करा : राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन

## एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टॅक्नॉलॉजी विद्यापीठ, विश्वराजबाग, पुणेच्या 7व्या दिक्षांत समारंभा प्रसंगी बोलत होते

**पुणे | प्रतिनिधी**

विद्यार्थी हा उद्याच्या विकसित भारताचा प्रमुख कणा आहे. भारताच्या या युवा पिढीने कधीही हताश न होता, शारीरिक व मानसिक आरोग्य संतुलित राखून आपल्या आवडीच्या क्षेत्रात यशस्विरित्या करिअर करावे. विद्यार्थ्यांनी दुसऱ्याच्या यश-अपयशाचा विचार न करता, केवळ आपले काम, प्रतिभा व तत्वांवर ठाम राहून कष्ट केल्यास कुठल्याही क्षेत्रात यश नक्कीच मिळते, असे आवाहन महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी मांडले.

एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टॅक्नॉलॉजी विद्यापीठ, विश्वराजबाग, पुणेच्या ७व्या दिक्षांत समारंभा प्रसंगी बोलत होते. या प्रसंगी माईर्स एमआयटी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, प्रतिष्ठित शास्त्रज्ञ इस्रो तथा यु.आर.राव उपकेंद्र, बंगळुरूचे संचालक डॉ. एम. शंकरन, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कुलगुरू तथा कार्यकारी अध्यक्ष प्रा.डॉ. मंगेश कराड, कार्यकारी संचालक प्रा.डॉ. सुनिता कराड, सौ.ज्योती ढाकणे-कराड, डॉ.विनायक घैसास, डॉ.सुचित्रा नागरे, प्र.कुलगुरू डॉ.रामचंद्र पुजेरी, डॉ.अनंत चक्रदेव, कुलसचिव डॉ.महेश चोपडे, परीक्षा नियंत्रक डॉ.ज्ञानदेव नीलवर्ण आदी मान्यवर उपस्थित होते.



### एकूण 2972 विद्यार्थ्यांना पदवी प्रदान

» राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत व विश्वशांती प्रार्थनेद्वारे सुरू झालेल्या या कार्यक्रमात विद्यापीठातील २२ पीएचडी, ५३ सुवर्णपदके व १९४ विद्यार्थ्यांना रँक होल्डर प्रमाणपत्र यांसह एकूण २९७२ विद्यार्थ्यांना राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पदवी बहाल करण्यात आली. या कार्यक्रमासाठी पालक व विद्यार्थ्यांसह ८ हजारपेक्षा अधिक लोकांनी देशभरातून हजेरी लावली. तसेच यावेळी राजदंडासह काढण्यात आलेल्या आकर्षक मिरवणुकीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. पसायदानाने सांगता झालेल्या या कार्यक्रमाचे आभार डॉ.पुजेरी यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा.स्नेहा वाघटकर व प्रा.स्वप्निल शिरसाठ यांनी केले.

राज्यपाल राधाकृष्णन पुढे म्हणाले, अध्यात्माचा संबंध हा प्रत्येकाच्या जिवनाशी व जिवनातील प्रत्येक गोष्टीशी असतो. आर्थिक प्रगतीसाठी मानवाची सांस्कृतीक प्रगतीही तितकीच महत्त्वाची असते. असेच मुल्याधिष्ठीत व संस्कृतीची जाण असणारे विद्यार्थी घडविण्याचे काम एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या माध्यमातून घडत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान व संशोधनाच्या माध्यमातूनच आपण गरिबी दूर करू शकतो आणि अशाच प्रकारच्या संशोधनाला प्रोत्साहन देण्याचे काम या विद्यापीठाकडून घडत आहे, असे म्हणत, राज्यपालांनी एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या पाठीवर कौतुकाची थापही टाकली.

### विद्यार्थ्यांच्या यशात संस्थेचा वाटा महत्वाचा

» एम.शंकरन म्हणाले, आपण कुठल्याही क्षेत्रात कमी नाही, हे भारताने नुकतेच जगाला दाखवून दिले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या संस्कृतीचा अभिमान आणि स्वाभिमान बाळगूण देशाचे नाव वाढविण्यासाठी प्रयत्नशिल राहिले पाहिजे. आपल्या देशात जगात कोणाकडेही नाही अशी प्रतिभावंत युवा पिढी आहे आणि याच युवा पिढीच्या खांद्यावर आता डॉ.कलाम यांनी दाखवलेल्या प्रगत देशाचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी आहे. विद्यार्थी केवळ स्वतः कष्टाने जीवनात यशस्वी होत नाही. तर त्याच्या यशामागे, संस्थेसह अनेकांचा हातभार लागलेला असतो. त्यामुळे आता पदवी घेवून समाजात प्रवेश करत असताना आपणही समाजाचे काहीतरी देणं लागतो, याचे कायम भान ठेवा, असा संदेशही त्यांनी यावेळी दिला.

> “ एमआयटी एडीटीने एक चांगला विद्यार्थी घडविण्यासोबतच एक मुल्याधिष्ठीत मनुष्य जो अध्यात्म व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भारताचे उज्वल भविष्य घडविण्यासाठी प्रयत्नशिल असतो, असे शिक्षण देण्याचा प्रयत्न केला आहे. या दीक्षांत समारंभाच्या माध्यमातून आज पदवी मिळविणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनीही भारताच्या उज्वल भविष्यात आपला अनमोल वाटा द्यावा, असे मी त्यांना आवाहन करतो.
>
> - प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड, संस्थापक अध्यक्ष, माईर्स एमआयटी शिक्षण समुह, भारत

# "पंतप्रधान मोदी साहेबांनी पिंपरी चिंचवड शहरातील खड्डेसफारीचा आनंद घ्यावा"..

## ठाकरे गटाच्या संतोष सौंदणकरांच नरेंद्र मोदींना जाहीर आमंत्रण.. शहरातील खड्ड्यांवरुन भाजपच्या कारभारावर सोडलं टीकास्त्र...

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेत एकहाती सत्ता असताना भाजपच्या नगरसेवकांनी फक्त पदपथ उभारण्यातच धन्यता मांडली. त्याचाच कित्ता आता पालिका प्रशासनदेखील गिरवताना दिसत आहे. कोणतेच काम धड नाही. सर्वत्र खड्ड्यांचे साम्राज्य बनल्यामुळे नागरिकांचा जीव टांगणीला लागला आहे. त्यामुळे स्मार्ट सिटीचा भकास कारभार चहाटयावर आला आहे. गुरुवारी (दि. २६) रोजी देशाचे पंतप्रधान आणि स्मार्ट सिटीचे जनक नरेंद्र मोदीसाहेब पुण्यात येणार आहेत. त्यांनी काहीसा वेळ काढून पुणे शहराच्या जुळ्या पिंपरी चिंचवड शहराला भेट द्यावी. महागड्या वाहनातून फेरफटका न मारता रिक्षातून विनामुल्य शहरातील खड्डेसफारीचा आनंद घ्यावा. त्यासाठी माझं देशाच्या पंतप्रधान साहेबांना जाहीर आमंत्रण आहे, अशी उपरोधिक टीका शिवसेनेचे (ठाकरे गट) चिंचवड विधानसभा संघटक संतोष सौंदणकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे.



### राष्ट्रपतींनी खड्डे बघितले आता पंतप्रधानांनी बघावेत....

» शहरातील चौका-चौकात सगळेच रस्ते खड्ड्यात गेले आहेत. ग्रेड सेपरेटरला तळ्याचं स्वरूप येतयं. काही ठिकाणी पाणी तीन तीन तास तुंबत. रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या अंगावर हे पाणी उडत नाही, तोपर्यंत रंगपंचमी चालूच असते. त्यामुळे वाहन चालकांची वादावादी होते. पाणी निचरा करण्याबाबतची यंत्रणा सक्षम नाही. पंतप्रधान साहेबांनी पिंपरी चिंचवड शहरातील रस्त्यांची दुर्दशा पहावी. स्वतः स्मार्ट सिटीचा अनुभव घ्यावा. यासाठी माझं खड्डे पाहण्याचं खुलं आमंत्रण स्वीकारून मोदी साहेबांनी शहरात यावं, असं या पत्रकात सौंदणकर यांनी म्हटले आहे..

पत्रकात त्यांनी म्हटले आहे की, सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पुणे दौऱ्यावर आलेल्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रवास मार्गावर असलेल्या खड्डयांबाबत राष्ट्रपती कार्यालयाने थेट नाराजी व्यक्त केली होती. आता २६ सप्टेंबर रोजी पुण्यात येणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यालाही तोच अनुभव येण्याची दाट शक्यता आहे. पिंपरी चिंचवड शहरात देखील रस्त्यांबाबत तशीच अवस्था आहे. विविध योजनांसाठी सुरू असलेले खोदकाम तसेच पाऊस यामुळे संपूर्ण शहरातील रस्त्यांवर खड्डे पडून रस्त्यांची शब्दशः चाळण झाली आहे. मध्यंतरी पावसाने उघडीप दिलेली असताना देखील खड्डे बुजविण्याची तोंडदेखली कार्यवाही पालिका प्रशासनाने केली. त्यामुळे खड्ड्यांची समस्या जैसे थे आहे. खड्ड्यांमुळे दररोज अपघात होत आहेत. नागरिक सातत्याने नाराजी व्यक्त करत असतानाही महापालिकेकडून फारसे प्रयत्न होत नाहीत.



# निळ्या पूररेषेतील बांधकामांवर कारवाई स्थगिती

## शंकर जगताप यांच्या प्रयत्नांना यश



**पुणे | प्रतिनिधी**

सांगवीतील पवना नदीलगतच्या निळ्या पूररेषेअंतर्गत असलेल्या निवासी आणि व्यावसायिक बांधकामांवरील कारवाईस अखेर पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह आज (मंगळवारी) स्थगिती दिली. भारतीय जनता पक्षाचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या विनंतीवरून झालेल्या या निर्णयामुळे लाखो नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. दरवर्षी नदीला पूर आल्यानंतर नदीपात्रा लगतच्या भागात पुराचे पाणी शिरते. त्यामुळे तेथील रहिवाशांना स्थलांतरित करावे लागते. पुराचा धोका असल्यामुळे निळ्या पूररेषेतील बांधकामामुळे मोठी दुर्घटना घडण्याची भीती असल्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाच्या वतीने अतिक्रमण कारवाई करण्याचा निर्णय आयुक्तांनी घेतला होता. या पार्श्वभूमीवर भाजपच्या शिष्टमंडळाने शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या नेतृत्वाखाली आज तातडीने महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांची भेट घेऊन यासंदर्भात सविस्तर चर्चा करीत सदर कारवाई तातडीने स्थगित करण्याची विनंती केली. विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत आजच्या बैठकीनंतर महापालिका प्रशासनाने कारवाईला स्थगिती दिली असून त्यामुळे निळ्या पूररेषेत येणाऱ्या लाखो नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

बैठकीस माजी महापौर उषा तथा माई ढोरे, माजी नगरसेवक हर्षल ढोरे, संतोष कांबळे, सुरेश भोईर, शारदाताई सोनावणे, राजू सावळे यांच्यासह सांगवी परिसरातील सर्व नागरिक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांगवीसह पिंपळे गुरव, रहाटणी, पिंपरी, काळेवाडी, वाकड या परिसरातील निळ्या पूररेषेत असलेल्या लाखो नागरिकांना महापालिकेच्या या कारवाईचा फटका बसणार आहे. या सर्वसामान्य नागरिकांच्या घरावर कोणतीही कारवाई करू नये, अशी मागणी करणारे निवेदन आयुक्तांना देण्यात आले.

# भामा आसखेड धरण पाणीपुरवठा योजनेचे काम प्रगतिपथावर!

## पिंपरी-चिंचवडकरांना मुबलक पाणी मिळण्यासाठी पाणीपुरवठा विभागाकडून जलदगतीने काम

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरामध्ये वाढते औद्योगीकरण, नागरीकरण व वाढत्या शहरीकरणामुळे लोकसंख्या वाढत आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील आधुनिक सोयी-सुविधांमुळे शहरामध्ये वास्तव्य करण्यासाठी नागरिकांचा कल वाढल्यामुळे येथील नागरिकांच्या पिण्याच्या पाणीक्षमतेमध्ये वाढ करणे क्रमप्राप्त ठरले आहे.

यासाठीच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने भामा आसखेड धरण पाणीपुरवठा योजनेमध्ये अंतर्भाव असलेले विविध प्रकल्प जसे की, अशुद्ध जल उपसा केंद्र, १७०० मिलिमीटर व्यासाची ७.३० कि.मी असलेली रायझिंग मेन, ब्रेक प्रेशर टँकची बांधणी, १४०० मि.मी. व्यासाची १८.८० किलोमीटरची ग्रॅव्हिटी मेन जलवाहिनी, चिखली येथील नियोजित २०० द.ल.लि. क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र अशा प्रकल्पांचे काम प्रगतिपथावर असून या माध्यमातून शहरास वाढत्या लोकसंख्येचा विचार करता



मुबलक पाणी मिळणार आहे. असे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### अशुद्ध जलउपसा केंद्राचे ६५ टक्के काम पूर्णत्वास

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने मंजुरी दिलेल्या अशुद्ध उपसा केंद्र मौजे वाकी तर्फे वाडा येथे बांधण्याचे काम ६५ टक्के पूर्ण झाले आहे. अशुद्ध उपसा केंद्राच्या माध्यमातून शहरासाठी प्रतिदिन १६७ द.ल.लि. इतके पाणी उपलब्ध होणार असून उर्वरित काम प्रगतिपथावर असल्याचे पाणीपुरवठा विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### २.८० किमी लांब १७०० मि.मी. व्यासाची रायझिंग मेन जलवाहिनी पूर्ण

मौजे वाकी तर्फे वाडा येथील अशुद्ध जल उपसा केंद्रापासून ते मौजे तळेगाव येथील ब्रेक प्रेशर टँक पर्यंत ७.३० किलोमीटरची १७०० मि.मी. व्यासाची रायझिंग मेन जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. त्यापैकी, २.८० किलोमीटर लांबीची जलवाहिनी टाकण्याचे काम पूर्णत्वास आले आहे. याबरोबरच, उर्वरित जलवाहिनीच्या कामाची कार्यवाही सुरू असून उर्वरित काम प्रगतिपथावर आहे.

### ब्रेक प्रेशर टँक बांधणीपूर्वीचे आवश्यक काम पूर्ण

भामा आसखेड अशुद्ध जलउपसा केंद्रातून पाणी उपसा करून १७०० मि.मी. व्यासाच्या जलवाहिनीमधून मौजे तळेगाव येथील नियोजित ब्रेक प्रेशर टँकपर्यंत आणण्यात येणार आहे. नियोजित ब्रेक प्रेशर टँक बांधणीपूर्वीचे अत्यावश्यक काम जसे की, माती परीक्षण, जीऐ ड्रॉइंग, स्ट्रक्चरल डिझाईन ड्रॉईंग आदी कामे पूर्णत्वास आली असून नजीकच्या काळात प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात होणार आहे.

### 8.40 किमीची ग्रॅव्हिटी मेन जलवाहिनी पूर्ण

» तळेगाव येथील ब्रेक प्रेशर टँक पासून चिखली जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पाणी नेण्यासाठी १८.८० किलोमीटर लांबीची १४०० मि.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. त्यानंतर ते पाणी चिखली जलशुद्धीकरण केंद्रामध्ये शुद्ध करून पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना उपलब्ध करून दिले जाणार आहे. एकूण १८.८० किलोमीटर जलवाहिनीच्या लांबीपैकी ८.४० किलोमीटर लांबीची जलवाहिनी टाकण्यात आली आहे. त्याबरोबरच, भामा आसखेड धरणातून मिळणाऱ्या १६७ द.ल.लि. पाण्यासाठी नियोजित २०० द.ल.लि. प्रतिदिनी क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र चिखली येथे बांधण्याचे काम सुरू असून हायड्रॉलिक, जीऐ ड्रॉइंग, स्ट्रक्चरल डिझाईन ड्रॉईंग तपासून घेण्याचे काम सुरू आहे.

> पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील नागरिकांना मुबलक पाणी मिळावे यासाठी महापालिकेकडून विविध प्रकल्पाची उभारणी करण्यात येत आहे. भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेच्या प्रकल्पांची कामे प्रगतिपथावर असून नियोजित वेळेपर्यंत प्रकल्प पूर्ण होऊन नागरिकांना मुबलक पाणी मिळणार आहे. नागरिकांना मुबलक पाणी देण्यासाठी महापालिका सदैव तत्पर असून प्रकल्पाचे काम जलद गतीने सुरू आहे.
>
> - शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.


# मोशीतील इंटरनॅशनल मल्टिपर्पज स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स ‘दृष्टीक्षेपात’

## महानगरपालिका प्रशासनाकडून निविदा प्रक्रिया सुरु : आमदार महेश लांडगे यांचा आणखी एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प

**पिंपरी | प्रतिनिधी**

भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पिंपरी-चिंचवडला स्पोर्ट्स हब बनवण्याचा संकल्प केला होता. त्याअनुशंगाने विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले आहेत. आंतरराष्ट्रीय बहुउद्देशीय क्रीडा संकूल उभारण्यासाठी त्यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू केला होता. त्याला यश मिळाले आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका अंतर्गत मौजे मोशी येथे गट क्र. ४४२ पै. व गट क्र. ४४५ पै मध्ये मंजूर विकास आराखड्यातील आरक्षण क्र.१/२०४ मध्ये स्टेडिअमचे प्रयोजन आहे. सदर ठिकाणी बहुद्देशीय क्रिडा संकुल उभारण्याबाबत महापालिका सभा क्र. ३९१ मध्ये दि. २५ जुलै २०२३ रोजी



मंजूर करण्यात आला होता. प्रस्तावित ठिकाणी ४.५६ हेक्टर क्षेत्रफळाचा भूखंड आरक्षित आहे. त्या ठिकाणी स्टेडिअम होणार आहे.

मुंबईतील बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्समधील एक भूखंड महाराष्ट्र क्रिकेट असोशिएन (MCA) मार्फत विकसित करुन चांगल्या प्रकारचा स्पोर्ट्स क्लब शहराला उपलब्ध झाला आहे. त्याच धर्तीवर पिंपरी-चिंचवडमध्ये इंटरनॅशनल मल्टीपर्पज स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स विकसित होणार आहे.

या कॉम्प्लेक्समध्ये क्रिकेट, फुटबॉल, व्हॉलीबॉल, बेसबॉल व जलतरण इत्यादी खेळासाठी व खेळाडुंना चालना मिळणार आहे. तसेच, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेस कायमस्वरुपी मिळकतकर उपलब्ध होणार आहे. सदर प्रकल्प “बांधा, अर्थपुरवठा करा, चालवा आणि हस्तांतर करा” तत्त्वावर सार्वजनिक खासगी भागीदारीद्वारे (PPP) उभारण्यात येणार आहे. त्यामुळे महानगरपालिकेचा या प्रकल्पावर खर्च होणार नाही.

> पिंपरी-चिंचवड शहराला ‘स्पोर्ट्स सिटी’ बनवण्याचा संकल्प आम्ही ‘भोसरी व्हीजन- २०२०’ मध्ये केला होता. त्याअंतर्गत आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षण केंद्र, आंतराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्र, इंटरनॅशनल बॉक्सिंग सेंटर, स्केटिंग ग्राउंड असे विविध प्रकल्प मार्गी लागले आहेत. या पुढील काळात पिंपरी-चिंचवड स्पोर्ट्स क्लब उभारण्याचा मानस आहे. त्याचे नियोजन नेहरुनगर येथील आण्णासाहेब मगर स्टेडिअममध्ये करण्यात येत आहे. तसेच, मोशी येथे प्रशासनाने आंतरराष्ट्रीय बहुउद्देशीय क्रीडा संकूलसाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करुन प्रकल्प उभारणी सुरू करावी आणि राज्यातील स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीचीही पायाभरणी करावी, अशी अपेक्षा आहे.
>
> - महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा.

# विकास आराखड्याला आचारसंहितेचे विघ्न

## उच्च न्यायालयात 7 ऑक्टोबरला हरकतींवरील सुनावणी : 69 हजार 200 नागरिकांच्या हरकती

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा (पीएमआरडीए) प्रारूप विकास आराखडा अंतिम करण्याच्या विरोधात उच्च न्यायालयात दाखल याचिकेवरील सुनावणी सुरू आहे. युक्तिवाद सुरू असतानाच आता ही सुनावणी ७ ऑक्टोबरला होणार आहे. दरम्यान, ऑक्टोबर महिन्यात विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता लागू शकते. पर्यायाने, प्रारूप विकास आराखडा अंतिम होण्याची कार्यवाही रखडण्याची शक्यता असून, त्याबाबत प्रशासनाला कोणतेही सोयरसुतक नसल्याचे दिसून आले.




पीएमआरडीएच्या प्रारूप विकास आराखड्याबाबत उच्च न्यायालयात सुदाम भसे, सुखदेव तापकीर आणि दीपाली हुलावळे यांचे विविध आक्षेप होते. त्यांनी या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात २५ जानेवारी २०२३ ला याचिका दाखल केली आहे. स्थानिक शेतकरी आणि ग्रामस्थांच्या विरोधात असणारा हा आराखडा असल्याचे सांगत त्यावर हरकतीही नोंदवण्यात आल्या आहेत.

दरम्यान पीएमआरडीएचे अध्यक्ष मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्याचे नियोजनही करण्यात आले. मात्र, काही कारणास्तव या बैठका पुढे ढकलण्यात आल्या. दरम्यान, महायुतीच्या कार्यकाळात हा आराखडा मंजूर करण्याबाबत निर्णय होऊ शकला नाही, तर त्यांच्या प्रयत्नावर पाणी फिरणार आहे. परिणामी, आणखी काही वर्षे पुन्हा विकास आराखडा प्रलंबित राहू शकतो.

याचिकेला अनुसरून मुंबई उच्च न्यायालयाने विकास आराखड्याबाबत 'जैसे थे' स्थिती ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार, सध्या या आराखड्याबाबत पुढील कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

दुसरीकडे, येत्या ७ ऑक्टोबरला याबाबत निर्णय झाला तरी त्यानंतर प्रारूप आराखड्याबाबत दाखल सूचना व हरकतींचा विचार करून आराखडा अंतिम करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यास विलंब लागू शकतो. या दरम्यान आचारसंहिता लागू झाल्यास त्याबाबत कोणताही निर्णय घेता येत नाही. पर्यायाने, आराखडा अंतिम करण्याचा निर्णय हा सत्तेत आलेल्या नव्या सरकारच्या कार्यकाळातच होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### 69 हजार 200 नागरिकांच्या हरकती

» पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरावर नागरीकरणाचा ताण वाढला आहे. हा ताण कमी करण्यासाठी पीएमआरडीएने ३० जुलै २०२१ रोजी प्रारूप विकास आराखडा प्रकाशित केला, त्यावर नागरिकांकडून हरकती व सूचना मागवण्यात आल्याने त्याबाबत ६९ ६९ हजार २०० हरकती प्राप्त झाल्या. स्थानिक नागरिक, शेतकरी, उद्योजक व काही बांधकाम व्यावसायिक यांनी विरोध दर्शवला आहे. यावरती डिसेंबर २०२२ सुनावणीचे काम सुरू झाले. तज्ज्ञ समितीने प्रारूप विकास आराखडा पीएमआरडीएला सादर करताना २३ शिफारशी केल्या आहेत. त्यावर अभिप्राय नोंदवून पीएमआरडीएकडून हा आराखडा महानगर नियोजन समितीला सादर करण्यात आला होता.

> उच्च न्यायालयाच्या आदेशानुसारच आराखडा अंतिम करण्याबाबत कार्यवाही सुरू करण्यात येईल. तूर्तास, ती सुनावणी आता पुढील महिन्यात होणार आहे.
>
> - योगेश म्हसे, आयुक्त, पीएमआरडीए.

# परवडणाऱ्या घरांमध्ये पुणे देशात आघाडीवर!

## जानेवारी ते जून या सहामाहीमध्ये पुणे पुन्हा एकदा परडवणाऱ्या घरांच्या विक्रीमध्ये देशातील प्रथम क्रमांकाचे शहर

**पुणे | प्रतिनिधी**

यंदा जानेवारी ते जून या सहामाहीमध्ये पुणे पुन्हा एकदा परडवणाऱ्या घरांच्या विक्रीमध्ये देशातील प्रथम क्रमांकाचे शहर म्हणून समोर आले. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे पुण्यातील घरांच्या सरासरी किमती या इतर मेट्रो शहरांच्या तुलनेत कमी आहेत. यामुळे पुणे हे राहण्यासाठी देशातील सर्वात परवडणारे महानगर बनले आहे.



क्रेडाई पुणे मेट्रो आणि सीआरई मॅट्रिक्स यांच्या 'पुणे हाउसिंग रिपोर्ट सप्टेंबर २०२४' मधून ही माहिती समोर आली आहे. क्रेडाई पुणे मेट्रोच्या कार्यालयात हा अहवाल सादर करण्यात आला. क्रेडाई पुणे मेट्रोचे अध्यक्ष रणजित नाईकनवरे, सीआरई मॅट्रिक्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिषेक गुप्ता, क्रेडाई पुणे मेट्रोच्या जनसंपर्क विभागाचे समन्वयक कपिल गांधी, व्यवस्थापन समितीचे सदस्य पुनीत ओसवाल, डेटा ॲनालिस्ट राहुल अजमेरा, हिरेन परमार आणि क्रेडाई पुणे मेट्रोचे शंभरहून अधिक सदस्य या वेळी उपस्थित होते.

या अहवालानुसार, यंदा पहिल्या सहामाहीत पुण्यात विक्री झालेल्या घरांची सरासरी किंमत ही ७१ लाख रुपये आहे. असे असले, तरी आजही पुणे शहर हे देशातील परवडणाऱ्या शहरांच्या यादीत प्रथमस्थानी आहे. पहिल्या सहामाहीत पुण्यात ३१ हजार कोटी रुपये मूल्याच्या सुमारे ४४ हजार घरांची विक्री झाली आहे. पुण्याच्या घरांच्या विक्रीच्या एकूण मूल्यामध्ये वार्षिक १६ टक्के वाढ नोंदविण्यात आली आहे. याचबरोबर ग्राहकांचा कल हा मोठे घर खरेदी करण्याकडे असल्याचेही समोर आले आहे.

> पुण्यात २०१९ च्या पहिल्या सहामाहीच्या तुलनेत यंदा पहिल्या सहामाहीत घरांची विक्री ३६ टक्के वाढली आहे. दुसरीकडे गृहखरेदीदार हे मोठ्या घरांना पसंती देत आहेत. इतर शहरांच्या तुलनेने पुणे आजही परवडणारे शहर आहे. त्यामुळे मागील तीन वर्षांप्रमाणे याही वर्षी देशातील परवडणाऱ्या घरांच्या विक्रीमध्ये व राहण्यायोग्य शहरांच्या यादीत पुणे आपले पहिले स्थान टिकवून आहे.
>
> - रणजित नाईकनवरे, अध्यक्ष, क्रेडाई पुणे मेट्रो

### अहवालातील ठळक मुद्दे

बाणेर, महाळुंगे, पाषाण, सूस, हिंजवडी, वाकड, ताथवडे या भागात एकूण विक्रीच्या तब्बल ६० टक्के घरांची विक्री

आंबेगाव, वारजे, कोथरूड, बावधन भागात २०२० च्या तुलनेत २०२४ च्या पहिल्या सहामाही घरांच्या किमतीत ४४ टक्के वाढ

गेल्या ५ वर्षांत शहरात रोजगारामध्ये ८ टक्के वाढ झाली असून, वेअर हाऊस आणि कार्यालयीन जागांना मागणी वाढणार